महाराष्ट्र टाइम्स
23 JUN 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Maruti.Patil
@timesgroup.com

# व्हर्च्युअल क्लासमध्ये विद्यार्थ्यांना धडे



**शिवाजी विद्यापीठाची झेप, १६१ कॉलेजांमध्ये नेटवर्क**

कोल्हापूर : आधुनिक शिक्षण प्रणालीचा स्वीकार करत शिवाजी विद्यापीठ विद्यार्थ्यांना प्रगत व आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे अभ्यासक्रमाची माहिती मिळावी यासाठी व्हर्च्युअल क्लासरुम सुरू करीत आहे. नॅशनल नॉलेज नेटवर्कच्या माध्यमातून विद्यापीठाशी सलंग्न १६१ कॉलेजांना यात कनेक्ट करण्यात आले आहे. यासाठी ३० सेंटरवरून नेटद्वारे अॅक्सेस देण्यात आला आहे. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाच्या नूतन इमारतीमध्ये या व्हर्च्युअल क्लासरुमची सुरुवात होईल.

चार भिंतीच्या आत मिळणारे शिक्षण ही पारंपरिक पद्धती वेगाने बदलत आहे. इंटरनेट, मोबाइल, संगणकशास्त्रातील प्रगती यामुळे माहितीची देवाण-घेवाण वेगाने आणि घरबसल्या होऊ लागली आहे. त्यामुळे ऑडिओ, व्हिडिओ आणि स्लाइड शोद्वारे (व्हिज्युअली) मिळणाऱ्या शिक्षणाला महत्त्व प्राप्त होऊ लागले आहे. बदलत्या तंत्रज्ञानाचे महत्त्व लक्षात घेवून प्राथमिक व माध्यमिक शिक्षणामध्ये इ-लर्निंगला महत्त्व आले आहे. तर अनेक इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये सीडीद्वारे शिक्षण दिले जाते. अशाच प्रकारचे शिक्षण विद्यापीठातील विद्यार्थी आणि देश, परदेशातील विद्यार्थ्यांना होण्यासाठी व्हर्च्युअल क्लासरुम सुरू करण्यात येणार आहे.

बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाच्या नूतन इमारतीत व्हर्च्युअल क्लासरुम सुरु करण्यात येईल. क्लासरुममधून ऑडिओ, व्हिडिओ, प्रेझेंटेशन कम्प्युटरच्या मदतीने करण्यात येईल. विद्यापीठातील लायब्ररी हा सर्वात मोठा रिसोर्स असल्याने त्याचा फायदा घेवून सर्व कॉलेजांपर्यंत माहिती पुरवली जाणार आहे.

त्यासाठी नॅशनल नॉलेज नेटवर्कच्या माध्यमातून विद्यापीठाशी सलंग्न १६१ कॉलेजांना कनेक्टिव्हिटी देण्यात आली आहे. ३० सेंटर्सवरून अॅक्सेस मिळणार आहे. इंटरनेट व मोबाइलद्वारे या व्हर्च्युअल क्लासरुमशी विद्यार्थी जोडले जातील. डिजिटल क्लासरुमद्वारे होणारे प्रेक्षपण कोठेही पाहता येईल. यावेळी विद्यार्थी व संबंधीत घटकांना येणाऱ्या शंकाचे निरसन क्लास सुरू असतानाच इंटरनेट अथवा 'टेलीफोन टॉप'द्वारे करता येणार आहे. केवळ प्रश्नांच्या उत्तरावर अपेक्षा न ठेवता क्लासरुमद्वारे मिळालेल्या ज्ञानाचा फीडबॅकही घेण्यात येणार आहे.

विद्यापीठातील या नव्या टेक्नॉलॉजीमुळे जागतिकीकरणाकडे विद्यार्थ्यांचे सक्षम पाऊल पडणार आहे. ज्ञान हे 'फ्री ऑफ कॉस्ट' या तत्त्वाप्रमाणे सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा मनोदय या उपक्रमाच्या माध्यमातून आहे. या नव्या उपक्रमाचे उद्घाटन रविवारी (ता. २६ जून) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.





जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत 23 JUN 2016

# एम.कॉम.साठी २ जुलैपासून पहिली फेरी

**गुणवत्ता यादी प्रसिद्ध :** हरकतीची सोमवारपर्यंत मुदत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील एम.ए., एम.कॉम. या पदव्युत्तर नियमित अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीची पहिली फेरी दि. २ ते ५ जुलै दरम्यान होणार आहे. या अभ्यासक्रमांची तात्पुरती गुणवत्ता यादी बुधवारी प्रसिद्ध झाली.

एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी. भूगोल या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश अर्ज भरण्याची मुदत २० जूनपर्यंत होती. बुधवारी तात्पुरती गुणवत्ता यादी प्रसिद्ध झाली. त्यातील दुरुस्ती व हरकती नोंदविण्याची मुदत सोमवार (दि. २७) पर्यंत आहे. गुरुवारी (दि. ३०) अंतिम गुणवत्ता यादी प्रसिद्ध केली जाईल. यानंतर प्रवेशाच्या पहिल्या फेरीसाठीच्या जागा २ जुलैला जाहीर करण्यात येणार आहेत, तर प्रत्यक्ष प्रवेशाची प्रक्रिया ५ जुलैला होणार आहे. या फेरीतून शिल्लक राहणाऱ्या जागांची घोषणा ७ जुलैला, तर त्यासाठी प्रत्यक्ष प्रवेशाची प्रक्रिया ८ जुलैला होईल. प्रवेशाच्या तिसऱ्या फेरीअंतर्गत इतर विद्यापीठांसाठी असलेल्या जागांकरिता स्पॉट ॲडमिशनसाठीच्या जागा ११ जुलैला जाहीर होतील. या जागांवर प्रत्यक्ष प्रवेश १२ जुलैला देण्यात येतील, अशी माहिती प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली.



## रिक्त जागांची आज घोषणा

पदव्युत्तर अधिविभागातील एम.एस्सी., एमसीए., बीजेसी., एमजेसी., बी.लिब., एम.लिब., यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटमधील एमबीए., एमएसडब्ल्यू, एमआरएस., एम.टेक., एमसीए, आदी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेतील पहिल्या फेरीसाठीची गुणवत्ता यादी १७ जूनला प्रसिद्ध झाली. या यादीमध्ये अग्रक्रमानुसार गुणवत्ता प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांसाठी सोमवार (दि. २०) पासून प्रवेश प्रक्रिया सुरु झाली. याअंतर्गत असलेल्या अभ्यासक्रमांच्या ८० टक्के जागांवर प्रवेश निश्चित झाले आहेत. यातील रिक्त जागांची घोषणा आज, गुरुवारी केली जाणार असल्याचे डॉ. शिंदे यांनी सांगितले.